| | |
|---|---|
| MHJN020009342025 | नि.दि.वा.क्र.२३६/२०२५<br>दिलिप व ईतर–वि–बाबासाहेब व ईतर |

**<u>निशाणी क्र.१३ वरील आदेश</u>**

**(दि.१६.०३.२०२६ रोजी पारीत)**

. प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांनी त्यांचे विरुध्द् दि.२८.११.२०२५ रोजी पारित झालेला विना लेखीजबाब आदेश रद्द करुन त्यांचा लेखीजबाब स्विकारण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**<u>प्रतिवादींचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>–**

२. प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांचे नुसार त्यांनी लेखीजबाब दाखल करण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादींना काही महत्वाची कागदपत्रे मिळण्यास बराच कालावधी लागल्यामुळे त्यांचे विरुध्द् विना लेखीजबाब आदेश पारित झालेला आहे. तसेच प्रतिवादी हे आजही त्यांचा लेखीजबाब दाखल करण्यास तयार आहे. सबब,त्यांचे विरुध्द् दि. २८.११.२०२५ रोजी पारित झालेला विना लेखीजबाब आदेश रद्य करण्यात येऊन त्यांना लेखीजबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

३. सदर अर्जावर वादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. त्यांचे

नुसार प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांनी सदर प्रकरणात विहित मुदतीत लेखीजबाब दाखल केलेला नाही. सदर अर्जामध्ये विना लेखीजबाब आदेश रद्य करण्यासाठी संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. करीता न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यास पात्र ठरतो. प्रस्तुतचा अर्ज केवळ नि.क्र.५ वरील सुनावणी प्रलंबीत रहावी या उद्देशाने दाखल केला असल्यामुळे वादींना खर्च रक्कम म्हणुन रु.३,०००/–देण्यात यावी अशी विनंती केली.

४. अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखीजबाबाचे अवलोकन केले.

५. वादी आणि प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

६. वादी यांनी दि.१५.०३.२०२४ रोजी संचिका क्र.२०२४/आरओ आर/सीआर–५२ मध्ये उप–विभागीय अधिकारी,जालना यांनीपारित झालेला न्यायनिर्णय वादींवर बंधनकारक नाही आणि शाश्वत मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द् दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.७ ते २० हे वाद मिळकतीमध्ये नवीन रस्ता तयार करण्याच्या तयारीत आहे व सदर मिळकत वादीच्या मालकी व ताब्याची आहे हे सिध्द् करण्यासाठी उभयपक्षांनी साक्षीपुरावा सादर करणे आवश्यक आहे. आजच्या टप्प्यावर अंतिम न्यायनिर्णयापूर्वी दावे प्रतिदाव्यातील तथ्थे अभिलेखावर येण्याच्या दृष्टीने,तसेच न्यायनिर्णयावेळी काही तांत्रीक मुद्ये राहू नये आणि प्रस्तुतचा दावा कायदेशीरपणे गुणदोषावर निकाली

काढण्याच्या दुष्टीने प्रतिवादी यांच्या विरुध्द् पारित झालेला विना लेखीजबाब आदेश रद्य करणे न्यायोचित ठरेल. करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांचा नि.क्र.१३ वरील अर्ज खर्च रक्कम रु.५००/–च्या दंडासह मंजूर करण्यात येतो. |
| २ | प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांच्या विरुध्द् दि.२८.११.२०२५ रोजी पारित झालेला विना लेखीजबाब आदेश रद्द करण्यात येतो. |
| ३ | प्रतिवादी क्र.१,३ व ६ यांना त्यांचा लेखीजबाब दाखल करण्याची परवानगी मंजूर करण्यात येते. |

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.03.17 15:10:12 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.१६.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शिरीष दि.देशमुख
न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),जालना
पी.डी.एफ.दिनांक :–दि.१७.०३.२०२६

लघुलेखक(म.)